## सह संचालक,नगररचना,मूल्यांकन कार्यालयातील कामकाज

## (FUNCTIONS IN JOINT DIRECTIOR OF TOWN PLANING VALUATION OFFICE)

वार्षिक मूल्य दर तक्ते तयार करण्याची प्रक्रीया महाराष्ट्र मुद्रांक (मिळकतीचे खरे बाजारमूल्य निश्चित करणे)नियम,1995 अन्वये ठरवून देण्यात आली आहे. त्यानुसार –

- राज्यातील मुंबई ,पुणे,ठाणे,नाशिक, नागपूर, व अमरावती या प्रादेशिक विभागांसाठी असलेले उप संचालक/ सहाय्यक संचालक,नगररचना,मूल्यांकन हे वार्षिक मूल्य दर तक्ते तयार करण्याविषयीचे काम करतात. तर औरंगाबाद व लातूर या दोन प्रादेशिक विभागांचे हे काम औरंगाबाद येथील सहाय्यक संचालक, नगररचना, मूल्यांकन यांचेकडून केले जाते.
- या उप संचालक/सहाय्यक संचालक,नगररचना यांचे सहाय्याने सह संचालक, नगररचना, मूल्यांकन महाराष्ट्र राज्य,पुणे हे राज्यासाठीचे वार्षिक मूल्य दर तक्त्याचे प्रस्ताव तयार करुन नोंदणी महानिरीक्षक तथा मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी यांचेकडे मान्यतेसाठी सादर करतात.

नोंदणी महानिरीक्षक तथा मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी यांचे मान्यतेनंतर वार्षिक मूल्य दर तक्ते अंतिम केले जातात व प्रत्येक वर्षाच्या 1 जानेवारी पासून ते अंमलात येतात.